# पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

**पर्यटन संचालनालय** : पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णय क्रमांक टीडीसी-२०१४/२/प्र.क्र.९६/पर्यटन, दि. १२.०४.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील पर्यटनाच्या वृध्दीसाठी तसेच शासनाच्या पर्यटन धोरणाची परिणामकारक आखणी आणि अंमलबजावणी करण्यासाठी पर्यटन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली पर्यटन संचालनालयाची स्थापना करण्यात आली आहे . सदर शासन निर्णयानूसार पर्यटन संचालनालयाचे प्रमुख संचालक (पर्यटन) असून त्यांचे अंतर्गत कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व अमरावती अशी ६ विभागीय कार्यालये आहेत. विभागीय कार्यालयांचे प्रमुख उपसंचालक ( पर्यटन) हे आहेत.

**उद्देश:** पर्यटन संचालनालयाचा मुख्य उद्देश हा पर्यटन धोरणांची आखणी व अंमलबजावणी करणे, शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे , पर्यटन वृद्धीसाठी पर्यटन घटकांना प्रोत्साहन देणे व त्यानुषांगिक पर्यटन प्रकल्पांना मंजुरी व विहित प्रमाणपत्रे देणे, राज्याच्या पर्यटन वृध्दीसाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजना, केंद्रीय अर्थ सहाय्यातून राज्यातील पर्यटन स्थळांचा पर्यटन दृष्ट्या विकास करणे. पायाभूत सुविधा निर्मित प्रकल्पांची आखणी करणे, विशेष प्रकल्प राबविणे. याकरीता निधीची तरतूद व विनियोग याबाबत सनियंत्रण ठेवणे, राज्यातील पर्यटन स्थळांना प्रसिध्दी देणे. राज्यांच्या पर्यटनाच्या वृध्दीसाठी प्रसिध्दी व प्रचालनासाठी राज्यातील, देशातील व आंतराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनाबाबतचे कार्यक्रम, प्रदर्शने, परिषदा, संवाद, महोत्सव यामध्ये सहभागी होणे व त्याकरीता नियोजन करणे, पर्यटकांच्या सुरक्षिततेविषयी उपाययोजना करणे इत्यादी आहे.

पर्यटन संचालनालयाच्या आस्थापनेवर सुरवातीला शासन निर्णय क्र.टीडीसी-2014/2/प्र.क्र/96.पर्यटन ,दि.14/07/2016 अन्वये विविध संवर्गातील ४४ पदे निर्माण करण्यात आली होती. तद्नंतर शासन निर्णय क्र. टीडीसी-२०१४/२/प्र.क्र.९६/पर्यटन, दि.01/11/2017 नुसार नव्याने ११ नवीन पदे निर्माण करण्यात आली असून,आजमितीस पर्यटन संचालनालयाचा आकृतीबंध हा ५५ पदांचा आहे.

**पर्यटन संचालनालयाच्या मार्फत राबविण्यात येणारी विविध धोरणे:**

- **महाराष्ट्र पर्यटन धोरण 2016**
- **कृषी पर्यटन धोरण**
- **बीच शॅक धोरण**
- **कॅराव्हॅन धोरण**
- **आदरातिथ्य क्षेत्रास औद्यागिक दर्जा देणेबाबत धोरण**
- **साहसी पर्यटन धोरण**
- **वेलनेस पर्यटन धोरण**

**महाराष्ट्र पर्यटन धोरण 2016** : महाराष्ट्र हे राज्य लोकसंख्या आणि क्षेत्रफळ या दोन्ही बाबतीत देशातले तिस-या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. राज्याची राजधानी मुंबई असून ती जगातल्या सर्वात मोठय़ा आणि उद्योगाच्या उलाढाली असलेल्या शहरांपैकी एक आहे, तसेच ती देशाची आर्थिक आणि करमणूक क्षेत्रातली राजधानी आहे.

महाराष्ट्र राज्य पर्यटकांना विविध प्रकारची पर्यटनस्थळे उपलब्ध असलेल्या जगातल्या मोजक्या भूभागांपैकी एक आहे. येथे हिरव्यागार कोकण भागालगत 720 किलोमीटर लांबीचा लांबलचक समुद्रकिनारा आहे. पश्चिम घाट आणि सह्याद्रीच्या पर्वतराजीमध्ये थंड हवेची ठिकाणे आहेत तसेच अर्धसदाहरित आणि पानगळ अरण्ये तसेच जलाशये आहेत. महाराष्ट्रातला विदर्भ भाग त्यातील दाट अरण्यांमुळे विविध अभयारण्ये आणि निसर्ग उद्यानांचे माहेरघर म्हणून ओळखतात. महाराष्ट्राला समृध्द इतिहास, परंपरा आणि संस्कृतीचे वरदान लाभलेले आहे, येथील जागतिक दर्जाचे प्राचीन किल्ले आणि स्मारके, प्राचीन गुफा, मंदिरे आणि यात्रा स्थळे याला पुष्टी देतात. भारतातील विदेशी पर्यटकांचे आगमन आणि देशांतर्गत पर्यटकांच्या भेटी या बाबतीत राज्य सगळ्या देशात आघाडीवर आहे. मोठय़ा प्रमाणावरील, परस्परांतर्गत जागतिक विकास आणि प्रगती यांचा प्रखर प्रभाव महाराष्ट्रातल्या पर्यटन क्षेत्रावर पडला आहे.

त्या अनुषंगाने जागतिक तसेच स्थानिक विकास डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र शासनाने पर्यटन क्षेत्र आणि त्यातून मिळणा-या संधी यांचे महत्त्व लक्षात घेतले आहे. त्यामुळे शासनाने पर्यटन क्षेत्र एक प्राधान्य क्षेत्र म्हणून निश्चित केले आहे. महाराष्ट्र शासनाचे नवे महाराष्ट्र पर्यटन धोरण 2016 प्रस्तावित आहे आणि हे धोरण 2006 मध्ये जारी केलेल्या महाराष्ट्राच्या पर्यटन धोरणाची जागा घेईल. हे धोरण म्हणजे पर्यटन क्षेत्रामध्ये खाजगी क्षेत्रातून गुंतवणूक व्हावी यासाठी असलेल्या शासनाच्या सर्वसमावेशक धोरणाचा एक भाग आहे. त्याहीपुढे जाऊन हे धोरण महाराष्ट्रामध्ये पर्यटन वाढीस चालना देणारी, पर्यावरणपूरक आणि नोक-यांना चालना देणारी जैव-व्यवस्था निर्माण व्हायला हातभार लावेल.

**कृषी पर्यटन धोरण:** शासन निर्णय क्र. टीडीएस-२०१९/८/प्र.क्र.५१४/पर्यटन, दि.28/09/2020 अन्वये कृषी पर्यटन धोरणास मान्यता देण्यात आली असून धोरणाची अंमलबजावणी पर्यटन संचालनालयामार्फत करण्यात येत आहे. पर्यटन संचालनालयाचे विभागीय स्तरावर कार्यालय आहे. कृषी पर्यटन धोरणांतर्गत स्थळपाहणीकरून प्रमाणपत्र निर्गमित करावे लागतात. राज्यातील सुमारे ५५ ते ६० टक्के लोक प्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी

फलोत्पादन, दुग्धव्यवसाय, शेळी व मेंढी पालन, कुक्कुट पालन, रेशीम उद्योग, मधुमतक्षकापालन, मत्स्यव्यवसाय इ. कृषी संलग्न विषयाचा विचार केल्यास, ग्रामीण भागामध्ये कृषी पर्यटनाला निश्चितपणे चालना मिळू शकते. राज्यातील शेतकऱ्यांना पुरक व्यवसाय उपलब्ध करुन देणे आणि शहरी पर्यटकांना शांत, निसर्गसंपन्न ठिकाणी राहून पर्यटनाचा आनंद मिळावा यासाठी एक सुनियोजित व्यवस्था निर्माण करुन पर्यटन विकास साध्य करण्यासाठी कृषी पर्यटन धोरण राबविण्यात आले आहे.

**बीच शॅक धोरण:** शासन निर्णय क्रं.टिडीएस २०२०/०२/प्र.क्र.१३८/पर्यटन, दि.१७/०८/२०२०. अन्वये बीच शॅक धोरण जाहिर करण्यात आले. या धोरणांतर्गत स्थळपाहणी करणे, तपासणी करणे, वेळोवेळी आढावा घेणे, इत्यादी कामांचा समावेश असून या धोरणाची अंमलबजावणी संचालनालयामार्फत करण्यात येत आहे.

**कॅराव्हॅन धोरण:** अतिदुर्गम भागात हॉटेल, रिसॉर्ट सारख्या राहण्याच्या सोयी अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. ज्या प्रतिबंधित क्षेत्रामध्ये कायमस्वरुपी बांधकामासाठी प्रतिबंध घालण्यात आले आहेत अशा ठिकाणी कॅराव्हॅन व कॅम्परव्हॅनच्या साहाय्याने पर्यटकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यास मदत होईल. शिवाय जेथे सध्या पक्के बांधकाम असलेल्या निवास व्यवस्था उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणी कॅराव्हॅन पर्यटन करता येईल. निर्सग जवळुन अनुभवण्याची संधी असलेल्या ठिकाणी पर्यटकांना राहण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होईल. "ना विकास क्षेत्राचा" व्यावसायिक गतिविधी करिता वापर करण्यास संधी मिळेल. कमी गुंतवणूक जास्त आर्थिक लाभ ह्यामुळे ज्या ठिकाणी निवासाची सोय नाही त्या ठिकाणी कॅराव्हॅन पर्यटन धोरणामुळे निवास व्यवस्था उपलब्ध होईल

**आदरातिथ्य क्षेत्रास औद्यागिक दर्जा देणेबाबत धोरण :** आदरातिथ्य क्षेत्रास औद्यागिक दर्जा देण्याबाबत शासन निर्णय क्रं.टिडीएस २०२०/०९/प्र.क्र.५०२/पर्यटन, दि.०३/१२/२०२० अन्वये निर्णय झाला असून याअंतर्गत हॉटेल व्यावसायीकांकडून वीच दर, वीज शुल्क, पाणी पट्टी, मालमत्ता कर, विकास दर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्यात येणार आहे. प्रथम टप्प्यात केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल्सना तद्नंतर महाराष्ट्रातील इतर हॉटेल्सना सदर सवलती लागू करण्याचे प्रस्तावित आहे. याअनूषंगाने हॉटेल्सची पाहणी करणे, अहवाल सादर करणे, नोंदणी देणे इत्यादी कामे पर्यटन संचालनालयास करावी लागणार आहे.

तसेच **साहसी पर्यटन धोरण, वेलनेस पर्यटन धोरण** व पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत प्रस्तावित केलेल्या विविध बाबींची/योजनांची अंमलबजावणी संचालनालयामार्फत होणार आहे.

## लोकसेवा सूची विवरणपत्र

| अ. क्र. | लोकसेवांची सुची | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी व त्यांचे पदनाम, कार्यालयीन पत्ता, दुरध्वनी | प्रथम अपिलीय प्राधिकारी व त्यांचे पदनाम, कार्यालयीन पत्ता, दुरध्वनी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी व त्यांचे पदनाम, कार्यालयीन पत्ता, दुरध्वनी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पर्यटक घटकांना तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देणे, | संपुर्ण कागदपत्रांसह अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन 3 महिने | सहाय्यक संचालक, पर्यटन संचालनालय, नरीमन भवन, 156/157, 15 वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21. दुरध्वनी क्र.022-69107600, 69107604 | सह संचालक, पर्यटन संचालनालय, नरीमन भवन, 156/157, 15 वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21. दुरध्वनी क्र.022-69107600, 69107604 | संचालक, पर्यटन संचालनालय, नरीमन भवन, 156/157, 15 वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21. दुरध्वनी क्र.022-69107600, 69107604 |
| 2 | पर्यटक घटकांना पात्रता प्रमाणपत्र देणे | संपुर्ण कागदपत्रांसह अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन 3 महिने | सहाय्यक संचालक, पर्यटन संचालनालय, नरीमन भवन, 156/157, 15 वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21. दुरध्वनी क्र.022-69107600, 69107604 | सह संचालक, पर्यटन संचालनालय, नरीमन भवन, 156/157, 15 वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21. दुरध्वनी क्र.022-69107600, 69107604 | संचालक, पर्यटन संचालनालय, नरीमन भवन, 156/157, 15 वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21. दुरध्वनी क्र.022-69107600, 69107604 |
| 3 | पर्यटक घटकांना मुद्रांक शुल्कात सवलत मिळण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे, | संपुर्ण कागदपत्रांसह अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन 2 महिने | सहाय्यक संचालक, पर्यटन संचालनालय, नरीमन भवन, 156/157, 15 वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21. दुरध्वनी क्र.022-69107600, 69107604 | सह संचालक, पर्यटन संचालनालय, नरीमन भवन, 156/157, 15 वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21. दुरध्वनी क्र.022-69107600, 69107604 | संचालक, पर्यटन संचालनालय, नरीमन भवन, 156/157, 15 वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21. दुरध्वनी क्र.022-69107600, 69107604 |

# पर्यटन संचालनालय संस्थात्मक पदानुक्रम

| अ.क्र | पदनाम |
|---|---|
| 1. | प्रधान सचिव (पर्यटन) |
| 2. | संचालक |
| 3. | सहसंचालक |
| 4. | कार्यकारी अभियंता |
| 5. | उपअभियंता (बांधकाम) |
| 6. | उपसंचालक |
| 07. | सहाय्यक संचालक (आस्थापना व प्रशासन) |
| 8. | सहाय्यक संचालक (विकास व प्रोत्साहने ) |
| 9. | सहाय्यक संचालक (प्रसिध्दी) |
| 10. | मुख्य लेखा अधिकारी |
| 11. | सहाय्यक लेखा अधिकारी |
| 12. | माहिती तंत्रज्ञान अधिकारी |
| 13. | अधिक्षक |
| 14. | उपलेखापाल |
| 15. | लघुलेखक (उच्चश्रेणी) |
| 16. | लघुलेखक (निम्नश्रेणी) |
| 17. | वरिष्ठ लिपिक |
| 18. | लिपीक टंखलेखक |
| 19. | वाहनचालक |
| 20. | शिपाई |

| मुख्य व विभागीय कार्यालयाचे नाव  व पत्ता |
|---|
| पर्यटन संचालनालय (मुख्य कार्यालय), मुंबई<br>नरीमन भवन, 15 वा माळा, विनय के. शहा मार्ग,<br>नरीमन पौइंट,  मुंबई- 400021<br>दूरध्वनी क्रमांक 022 – 69107600 |
| उपसंचालक (पर्यटन)<br>पर्यटन संचालनालय विभागीय कार्यालय<br>७ वा मजला, कोकण भवन इमारत,<br>सखाराम पाटील मार्ग, सेक्टर ६, सी. बी. डी. बेलापूर,<br>नवी मुंबई – 400 614<br>दुरध्वनी – 9604328000 |
| उपसंचालक (पर्यटन)<br>पर्यटन संचालनालय विभागीय कार्यालय<br>'आय' ब्लॉक, सेंट्रल बिल्डिंग,<br>पुणे – 411 001<br>दुरध्वनी – 9860025212 |
| उपसंचालक (पर्यटन)<br>पर्यटन संचालनालय विभागीय कार्यालय<br>शासकीय विश्राम गृह आवार, गोल्फ क्लब मैदानासमोर,<br>नाशिक – 422 002<br>दुरध्वनी (०२५३) २५७००५९/२५७९३५२/8975914775 |
| उपसंचालक (पर्यटन)<br>पर्यटन संचालनालय विभागीय कार्यालय<br>म.प.वि.म. पर्यटक निवास, स्टेशन रोड,<br>औरंगाबाद – 431 001<br>दुरध्वनी – 7588649230 |
| उपसंचालक (पर्यटन)<br>पर्यटन संचालनालय विभागीय कार्यालय<br>वेस्ट हायकोर्ट रोड, ग्रामीण तहसील कार्यालयाजवळ<br>सिव्हिल लाईन्स, नागपूर – 440 001<br>दुरध्वनी – 8422822058 |
| उपसंचालक (पर्यटन)<br>पर्यटन संचालनालय विभागीय कार्यालय<br>बॅरॅक क्रमांक – ३, अन्न वितरण कार्यालयाजवळ,<br>जिल्हाधिकारी  कार्यालय आवार,<br>अमरावती – 444 601<br>दुरध्वनी - 9403183079 |

**Website URL Link of Directorate of Tourism:-**
[www.maharashtratourism.gov.in](http://www.maharashtratourism.gov.in)